**Mahavidarbha, Nagpur, Sep 02 2012**

# टीसीएस आयटी क्विझ २०१२ चे प्रथम पर्व

नागपूर : टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस ने आयोजित केलेल्या आणि गुरूवारी ३ ऑगस्ट रोजी नागपूरमध्ये सिव्हील लाईन्समधील एमएलए हॉस्टेलसमोर असलेल्या डॉ वसंतराव देशपांडे सभागृहात पार पडलेल्या भारतातील सर्वात मोठी आंतरशालेय आयटी प्रश्नमंजुषा असलेल्या टीसीएस आयटी क्विझच्या प्रथम नागपूर पर्वाला वेगवेगळया शहरी शाळांमधील १४०० हून अधिम विद्यार्थ्यांचा भरघोष प्रतिसाद मिळाला. प्राथमिक फेरीनंतर आणि उत्सुकता ताणून धरणाऱ्या अवघड आणि किचकट अंतिम फेरीमध्ये सेंटर पाईंट शाळेच्या परितोश कान्हे आणि अनिरूद्ध मोरारका यांनी बाजी मारली आणि विजेत्यांसाठी असलेल्या चषकाचे आणि प्रत्येक एका गॅलक्सी नोटचे मानकरी ठरले डीपीएस शाळेच्या अभिषेक अंबूलकर आणि अबू बकर सी यांना उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले असून त्यांनाही उप विजेत्याच्या चषक आणि गॅलक्सी टॅब देऊन गौरवण्यात आले पुरस्कधागरांचे वितरण व्हीएनआयटीचे अधिष्ठाता आणि प्रमुख पाहुणे डॉ आरके इंगळे आणि टीसीएसचेउपाध्यक्ष आणि केंद्र प्रमुख चैतन्य साठेयांच्या हस्ते करण्यात आले चैतन्य साठे म्हणाले गेल्या काही वर्षामध्ये पुढील पिढीमधील गुणवत्तेच्या माहिती तंत्रज्ञानाशी परिचय करून देण्यासाठी उत्तम व्यासपीठ म्हणून टीसीएस आयटी क्विझने आपली उपयुक्तता वेळोवेळी सिद्ध केलेली आहे.